तरुण भारत ▪ शुक्रवार, ७ सप्टेंबर २०१८

# दोडामार्ग कॉलेजात रंगला श्रावणोत्सव

## युवाईने लुटला पावसाळी कवितांचा आनंद : नृत्य, गायन, वादनही



दोडामार्ग : श्रावणोत्सवात गीत गाताना महाविद्यालयातील विद्यार्थिनी. समीर ठाकुर

वार्ताहर
झरेबांबर

'श्रावणमासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहीकडे' या बालकवींच्या कवितेचा साक्षात अनुभव युवाईमध्ये पाहावयास मिळाला. हव्याहव्याशा वाटणाऱ्या श्रावणात मग युवाईचे सौंदर्यविश्व उचंबळून आले. त्यातूनच काव्यसरी बरसून नृत्याचा मोरपिसारा थुई-थुई नाचू लागला. नृत्य, गायन व वादन यांची सुरेख मैफिल जमली. त्यातूनच 'इलो गो ह्यो पावसाळो, तुझ्या माझ्या प्रेमाचो खेळ चिखलात कसो गो खेळाया!' अशा प्रेयसीला साद घालणाऱ्या मालवणी कवितांनी श्रावणोत्सव चिंब भिजला. निमित्त होते ते येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात मराठी विभाग आणि मराठी भाषा वाङ्मय मंडळाने आयोजित केलेल्या 'श्रावणोत्सव' या पावसाळी कार्यक्रमाचे.

महाविद्यालयाच्या आजी-माजी विद्यार्थ्यांनी श्रावणातील मनाला वाटणारा हा हर्ष काव्य, वादन, गायन व नृत्यांच्या माध्यमातून सुंदरपणे जुळवून त्यांचा हिरवागार आविष्कार श्रोत्यांना घडविला. महादेव नाईक या माजी विद्यार्थ्याने लिहिलेल्या 'आवक माळवली' कवितांनी मग धमाल उडवून दिली. हास्याच्या सप्तरंगी कारंजांची लकेर संपूर्ण कार्यक्रमात उमटत राहिली. 'हासरा नाचरा जरासा लाजरा' 'श्रावण आला', ढगाला आग लागली पळा, पळा, रौद्र अवतार पावसाचा, तुका पण घेवन जातले, अशी कवितांबरोबरच रिमझिम गिरे सावन, सुलग-सुलग जाए मन या सारख्या हिंदी गीतांच्या तालावर उपस्थित धुंद झाले.

राजेश नाईक, समीर सुतार या माजी विद्यार्थ्यांनी कलाविष्कार सादर करुन वाहवा मिळवली. मंडळाचे समन्वयक प्रा. दिलीप बर्वे यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन दिशा तेंडले तर आभार प्रा. सोपान जाधव यांनी मानले.